क्रमांक:सुसआप्रयो/गट-ब(अराज)/प्र.क्र.२९ /प्रशा-२ /२३३
अर्थ व सांख्यिकी संचालनालय,
महाराष्ट्र शासन, प्रशासकीय इमारत,
८ वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व),
मुंबई-४०० ०५१.
दिनांक : १८/०६/२०२०

**वाचा :**

१. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक :एसआरव्ही-१०९५/प्र.क्र.१ /९५/बारा,दिनांक ०८/०६/१९९५
२. वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक : वेतन-११९९/प्र.क्र.२/९९/सेवा-३, दिनांक २०/०७/२००१
३. वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक : वेतन-११०९/प्र.क्र.४३/सेवा-३, दिनांक ३१/०८/२००९
४. वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक : वेतन-११०९/प्र.क्र.४४/सेवा-३, दिनांक १/०४/२०१०
५. वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक : वेतन-११११/प्र.क्र.८/सेवा-३, दिनांक ०१/०७/२०११
६. वित्त विभाग, शासन शुद्धीपत्रक क्रमांक : आप्रयो-२०१५/प्र.क्र.१११/२०१५/सेवा-३, दि. २३/१२/२०१५
७. वित्त विभाग, शासन शुद्धीपत्रक क्रमांक : वेतन-१११०/प्र.क्र.०८/२०१०/सेवा-३, दिनांक ०१/०२/२०२०

**कार्यालयीन आदेश**

वित्त विभागाच्या उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयांन्वये राज्य शासकीय कर्मचा-यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्यात आली आहे. संदर्भ क्र. १ समोरील शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या पहिल्या लाभासाठी आवश्यक असणा-या अटींची खालील कर्मचारी पुर्तता करीत असल्याने त्यांना पदोन्नती साखळीतील संशोधन सहायक गट ब (अराजपत्रित) या वरिष्ठ वेतन बॅन्ड रुपये ९३००-३४८०० मधील ग्रेड वेतन रुपये ४३०० ही वेतनश्रेणी त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकापासून लागू करण्यात येत आहे.

| अ. क्र. | कर्मचा-यांचे नांव | आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ लागू होण्याचा दिनांक | अ. क्र. | कर्मचा-यांचे नांव | आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ लागू होण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | श्री. ल. भं. गभाले,<br>संशोधन सहायक,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई. | १०/०६/२००९ | २. | श्री. भि. ग्या. मरसकोल्हे,<br>संशोधन सहायक,<br>जिल्हा नियोजन समिती,<br>जिल्हाधिकारी कार्यालय,<br>भंडारा. | २९/०५/२०१० |

२. सदर आदेशातील नमूद कर्मचा-यांना आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

अ. या योजनेमुळे सदरील कर्मचा-यांच्या जबाबदा-या आणि कर्तव्ये यात वाढ होत नसली तरीही त्यांना उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णयातील तरतुदींच्या अधिन राहून नियमित पदोन्नतीप्रमाणे संशोधन सहायक, गट ब

(अराजपत्रित) या संवर्गाचा वेतननिश्चितीचा लाभ देण्यात येत असून या वेतनश्रेणीत त्यांना झालेला हा लाभ त्याच वेतनश्रेणीत त्यांना कार्यात्मक पदोन्नती मिळाल्यावर पुन्हा देण्यात येणार नाही.

ब. या योजनेतर्गत संशोधन सहायक, गट ब (अराजपत्रित) या पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी मिळाली तरीही सदर कर्मचा-यांची नांवे ते धारण करीत असलेल्या संवर्गाच्या ज्येष्ठतासूचीतच राहतील.

क. सदर कर्मचा-यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ (दुसरी सुधारणा) नियम १९९३ मधील नियम ११ (१) खालील परंतुकानुसार पदोन्नतीच्या पदाच्या वेतनश्रेणीतील वेतननिश्चितीसाठी द्यावयाचा विकल्प हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत संबंधित कार्यालय प्रमुखांकडे द्यावा. सदर मुदतीनंतर दिलेल्या विकल्पाचा विचार केला जाणार नाही आणि सदर कर्मचा-यांना विकल्प द्यावयाचा नाही असे गृहीत धरुन त्यांची वेतननिश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ (दुसरी सुधारणा) नियम १९९३ मधील नियम ११ (१) (एक) नुसार तसेच वित्त विभागाच्या उपरोक्त दिनांक ३१/८/२००९ च्या शासन निर्णयामधील परिच्छेद-३ (ब) नुसार करण्यात येईल. संबंधित कार्यालयाने याबाबतची कार्यवाही करावी.

३. सदरहू आदेश हे विभागीय निवड समितीच्या शिफारशीनुसार व शासन निर्णयातील तरतुदींच्या अनुषंगाने तसेच शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक ११ जानेवारी, २००२ अन्वये राज्यस्तरीय विभागप्रमुखांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

रारशिंगे

(र. र. शिंगे)
अर्थ व सांख्यिकी संचालक
मुंबई.

प्रति,

१. श्री. ल. भं. गभाले,
संशोधन सहायक,
बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.

२. श्री. भि. ग्या. मरसकोल्हे,
संशोधन सहायक,
जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा

प्रत :

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १, मुंबई.
२. अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
३. उपआयुक्त (नियोजन), बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई
४. जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा
५. सह संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, प्रादेशिक कार्यालय, नागपूर/ कोकण, नवी मुंबई.

प्रत :

१. अपर संचालक (सर्व) []
२. सह संचालक (सर्व) []
३. प्रशासन शाखा-१/२/३/४ []
४. सेवापुस्तक कार्यासन (प्रशासन-४) []
५. निवड नस्ती []

अर्थ व सांख्यिकी संचालनालय,
मुख्य कार्यालय, मुंबई.